ठाणे, बुधवार दि. १९ जून २०२४ | वर्ष : १३, अंक : ५२ , पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026


# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे


अग्रलेख

**दुहेरी कात्रीत अजितदादा**

विधानपरिषदेच्या ११ जागा रिक्त होत असून त्यासाठी १२ जुलै रोजी निवडणूक होत आहे. विधानसभा निवडणुकीआधी या ११ जागांपैकी जास्तीत जास्त जागा ....पान २ वर

ठाणे जिल्ह्यातील महिला बचत गटांनी शिवलेले शालेय गणवेश विद्यार्थ्यांना वाटप ...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा... ePaper PDF www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७२,५५० | चांदी ९३,५००

डोकं खाजवा –अशोक सुतार

# विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी निवडणुकीची घोषणा

**12 जुलैला मतदान!**

**मुंबई : गेल्या कित्येक दिवसांपासून विधानपरिषदेच्या ११ जागांसाठीच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या निवडणुकीसाठी उमेदवारांची निवड प्रक्रियाही राजकीय पक्षांनी चालू केली होती. फक्त निवडणूक आयोग या निवडणुकीची घोषणा कधी करणार याची सर्वांना प्रतीक्षा होती. दरम्यान, आता ही प्रतीक्षा संपली असून निवडणूक आयोगाने महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणुकीची घोषणा केली आहे. त्याबाबतचे वेळापत्रकही निवडणूक आयोगाने जारी केले आहे.**

## असा असेल निवडणूक कार्यक्रम



निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी येत्या १२ जुलै रोजी मतदान होईल. त्याच दिवशी म्हणजेच १२ जुलै रोजी निकाल जाहीर केला जाईल. या निवडणुकीसाठी येत्या २५ जून रोजी निवडणूक आयोगाकडून अधिसूचन जारी केली जाईल. त्यानंतर उमेदवारांना २ जुलैपर्यंत आपला उमेदवारी अर्ज दाखल करता येईल. ३ जुलै रोजी अर्जांची छाननी केली जाईल. तर उमेदवारांना आपला उमेदवारी अर्ज ५ जुलैपर्यंत मागे घेता येईल. १२ जुलै रोजी या निवडणुकीसाठी प्रत्यक्ष मतदान होईल. सकाळी नऊ ते चार वाजेपर्यंत यासाठी मतदान करता येईल. १२ जुलै रोजीच मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

## खालील आमदार होणार निवृत्त

विधानसभेच्या आमदारांनी मतदानाच्या माध्यमातून नियुक्त केलेले विधानपरिषदेच्या ११ आमदारांचा कार्यकाळ येत्या २७ जुलै रोजी संपणार आहे. त्यामुळे त्यांच्या जागेवर अन्य व्यक्तींची आमदार म्हणून निवड केली जाईल. २७ जुलै रोजी कार्यकाळ संपणाऱ्या आमदारांमध्ये विजय गिरकर, निलय नाईक, रमेश पाटील, रामराव पाटील (भाजप), महादेव जानकर (भाजप मित्र पक्ष), अनिल परब (शिवसेना ठाकरे गट), मनीषा कायंदे (शिवसेना शिंदे गट), डॉ. वजाहत मिर्झा व डॉ. प्रज्ञा सातव (काँग्रेस), बाबाजानी दुराणी (राष्ट्रवादी), जयंत पाटील (शेकाप) या ११ आमदारांचा समावेश आहे.

## महायुतीचा प्रयत्न यशस्वी होणार का ?

दरम्यान, आता विधानसभेचे संख्याबळ घटल्याने निवडून येण्यासाठी पहिल्या पसंतीच्या मतांच्या कोट्यात घट झाली आहे. भाजपचा पाच जागा निवडून आणण्यासाठी प्रयत्न असेल. शिंदे गट आणि अजित पवार गटही प्रत्येकी दोन जागांसाठी प्रयत्नशील आहेत. याचाच अर्थ महायुती ९ जागांसाठी प्रयत्न करण्याची शक्यता आहे. काँग्रेसचा एक उमेदवार सहजपणे निवडून येऊ शकतो. ठाकरे गट आणि शरद पवार गटाकडे स्वबळावर उमेदवार निवडून आणण्यासाठी पुरेसे संख्याबळ नाही. पण दोघांची मते एकत्र केल्यास एक उमेदवार निवडून येऊ शकतो.

## उज्ज्वल निकामांच्या सरकारी वकीलपदी पुनर्नियुक्तीला विरोध

मुंबई - ॲड. उज्वल निकम यांनी लोकसभेच्या निवडणुकीत भाजपाचे (BJP) उमेदवार म्हणून निवडणूक लढवलेली असताना त्यांची सरकारी वकील पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याची सरकारी वकील पदावर नियुक्ती करुन भाजपा सरकार चुकीचा पायंडा पाडत आहे. उज्वल निकम यांच्या सरकारी वकील पदाच्या नियुक्तीस काँग्रेस पक्षाचा तीव्र विरोध असून सरकारने त्याचा फेरविचार करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

**उज्जल निकम यांना पराभवानंतही बक्षीस**

उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी उज्जल निकम यांचा पराभव केला. लोकसभा निवडणुकीसाठी उज्ज्वल निकम यांनी आपल्या विशेष सरकारी वकिल पदाचा राजीनामा दिला होता. पण पराभवानंतरही त्यांना बक्षीस मिळालं आहे. उज्ज्वल निकम यांची सरकारी वकीलपदी पुन्हा फेरनियुक्ती करण्यात आली आहे.

# रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र महामंडळ

**मुख्यमंत्र्यांची घोषणा**

**■ विम्याचे संरक्षण, कुटूंबियांना मोफत उपचार, ग्रॅज्युईटी आणि मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार**

**मुंबई :– शहरातील रिक्षा आणि टॅक्सी चालवून प्रतिदिनी हातावर पोट असलेल्या लोकांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. आज शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम यांच्या पुढाकाराने भेटीसाठी आलेल्या रिक्षा टॅक्सी चालकांच्या शिष्टमंडळाच्या प्रतिनिधींशी बोलताना त्यांनी या महामंडळाच्या अंतर्गत मिळणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली. यावेळी राज्याचे एमएसआरडीसी मंत्री दादाजी भुसे, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम आणि रिक्षा टॅक्सी चालकांच्या विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.**

यावेळी बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी, सध्या मुंबईत रिक्षा आणि टेक्सी चालकांना परिवहन विभागाकडून जो अतिरिक्त दंड आकारला जातो तो यापूढे आकारला जणार नाही असे सांगितले. तसे स्पष्ट निर्देश परिवहन विभागाच्या आयुक्त आणि पोलीस उपयुक्तांना दिले असल्याचे सांगितले. मात्र त्यासोबतच नियम मोडला असेल तर मात्र हा दंड आकारला जाईल असेही स्पष्ट केले. त्यासोबतच रिक्षा टॅक्सी चालकांसाठी 'महाराष्ट्र टॅक्सी ऑटोरिक्षा चालक (पान २ वर)



## चालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती

या महामंडळाअंतर्गत प्रत्येक रिक्षा टॅक्सी चालकाला जीवन विमा कवच देण्यात येईल, तसेच त्याला तसेच त्यांच्या कुटूंबियांना मोफत वैद्यकीय उपचार मिळावे यासाठी तरतूद करण्यात येणार आहे. अपघातात अचानक कुणी जखमी झाल्यास त्याला तातडीची मदत म्हणून ५० हजार देणार, ज्या रिक्षा किंवा टॅक्सी चालकांच्या मुलांना शिकायचे असेल त्याना शिष्यवृत्ती तसेच उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्यात येईल, त्यांच्या मुलांना कौशल्यविकास विभागाच्या माध्यमातून तंत्रकुशल केले जाईल.

## परदेशी नोकरीसाठी जाण्याची संधी

तसेच मुख्यमंत्री रोजगार योजनेच्या माध्यमातून त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळेल. यासोबतच शासनाचा जर्मन सरकारसोबत चार लाख तंत्रकुशल मनुष्यबळ पुरवण्याचा करार झाला असून त्याअंतर्गत कुशल चालकांना परदेशी नोकरीसाठी जाण्याची संधी मिळेल.

## ग्रॅज्युईटी मिळण्यासाठी तरतूद


६३ वर्षावरील चालकांना ग्रॅज्युईटी मिळावी यासाठी देखील तरतूद करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक चालकाला वर्षाला ३०० रुपये म्हणजे प्रतिमहिना २५ रुपये जमा करावे लागतील तर त्यात उर्वरित भर शासनाकडून टाकण्यात येईल. त्यासाठी उद्योग, खनिकर्म आणि परिवहन विभागाच्या माध्यमातून निधीची तरतूद करण्यात येईल असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## परिवहनकडून कार्ड काढणे आवश्यक

येत्या काही दिवसात या महामंडळाची रुपरेषा अंतिम करून परिवहन विभागाच्या कार्यालयामार्फत याचे लाभ रिक्षा टॅक्सी चालकांपर्यंत पोहचवण्यात येतील. परिवहन विभागातून याचे कार्ड काढावे लागणार आहे.




# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## दुहेरी कात्रीत अजितदादा

विधानपरिषदेच्या ११ जागा रिक्त होत असून त्यासाठी १२ जुलै रोजी निवडणूक होत आहे. विधानसभा निवडणुकीआधी या ११ जागांपैकी जास्तीत जास्त जागा जिंकण्याचे महायुती आणि महाविकास आघाडीसमोर आव्हान असेल. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला फारसे यश आलेले नव्हते. या निवडणुकीत महायुतीला पुन्हा जास्त जागा मिळवण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. या निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधक यांच्या घटक पक्षातील आमदारांची निष्ठा कुणाशी व किती आहे, याचा निकाल लागणार आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकीत विधानसभेतील आमदारांना गुप्त मतदान करावे लागते. सध्या विधानसभेत २८८ पैकी २७४ आमदार आहेत. काही आमदार खासदार झाल्यामुळे तर काही आमदारांचा मृत्यू, निलंबनामुळे संख्या कमी झाली आहे. विधानपरिषदेच्या निवडणुकीत महायुती व महा विकास आघाडीला आपले आमदार एकसंध ठेवायचे आव्हान समोर असणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या लागलेल्या निकालानंतर झालेल्या राजकीय घडामोडींवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भाजपा आणि स्वपक्षातूनच विरोध होत आहे.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त एक जागा मिळाली आहे. त्यानंतर आता विधान परिषदेच्या निवडणुकीला सामोरे जायचे आहे. विधानपरिषदेतील ११ आमदार २७ जुलै रोजी निवृत्त होत आहेत. विधानसभा निवडणुकीला काही महिने उरले असताना ही निवडणूक लागली आहे. म्हणजेच विधानपरिषदेची निवडणूक ही विधानसभेच्या निवडणुकीची रंगीत तालीम असणार आहे. विधानपरिषदेत ११ पैकी चार आमदार भाजपाचे आहेत. काँग्रेस २ तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना उबाठा, शिवसेना शिंदे गट, शेकाप आणि राष्ट्रीय समाज पक्षाचा प्रत्येकी एक आमदार आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटातील १८ ते १९ आमदार पुन्हा एकदा शरद पवार गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अजितदादा चिंतेत आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या निकालामध्ये महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. राज्यातील एकूण ४८ पैकी ३० ठिकाणी मविआने विजय मिळविला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी महा विकास आघाडीच्या नेत्यांचा विश्वास दुणावला आहे. शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर गंभीर आरोप करताना या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदारांना होणाऱ्या निधीच्या वाटपावर आमचे लक्ष असल्याचे सांगितले होते. तसेच अजित पवारांना अर्थसंकल्प सादर करण्याची ही शेवटची संधी असल्याचेही मविआकडून सांगण्यात आले. याचा अर्थ मविआचे महायुतीच्या सरकारवर व त्यांच्या भूमिकेवर बारीक लक्ष असणार आहे. दरम्यान महायुतीमध्येही अजित पवार यांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. अजित पवार गटाने लोकसभेला लढविलेल्या चार पैकी केवळ एकाच जागेवर विजय मिळविता आला. तसेच महायुतीच्या इतर जागांना अजित पवार गटाचा कोणताही फायदा झाला नसल्याचाही आरोप अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसवर केला जात आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुखपत्रातून अजित पवारांना लक्ष्य करण्यात आले होते. अजित पवारांना बरोबर घेतल्यामुळे भाजपाचे नुकसान झाले, असा दावा संघाच्या ऑर्गनायझर या मुखपत्रातून करण्यात आला. यानंतर अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि राज्याचे अध्यक्ष सुनील तटकरे यांनी हा दावा खोडून काढला. संघाने मांडलेली भूमिका ही भाजपाशी संबंधित नसल्याचा खुलासा त्यांनी केला. गत आठवड्यात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपा आणि शिवसेनेचा एकही नेता उपस्थित नव्हता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या नियोजनासाठी कामगार सल्लागार समितीच्या बैठकीला अर्थमंत्री अजित पवारच गैरहजर राहिले होते. दुसरीकडे अजित पवारांना पक्षांतर्गत नाराजीचाही सामना करावा लागत आहे. सुनेत्रा पवार यांच्या पराभवानंतर त्यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली. त्यावरून छगन भुजबळ नाराज आहेत. भुजबळ राज्यसभेसाठी इच्छुक होते, असे म्हटले जाते. यानंतर भुजबळांनी महात्मा फुले समता परिषदेची बैठक घेऊन ओबीसींच्या प्रश्नांविषयी चर्चा केली. या बैठकीत भुजबळांवर राजकीय अन्याय होत असल्याचा मुद्दा कार्यकर्त्यांनी समोर आणला.अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतृत्वावर अशा रीतीने भाजपाकडून व पक्षांतर्गत आरोप होत असल्याने अजितदादा चिंतेत आहेत. पक्ष सांभाळायचा म्हणजे त्याग आला. परंतु अजितदादांनी पत्नी सुनेत्रा पवारांना लोकसभा निवडणुकीत अपयश मिळाले असताना काही ज्येष्ठ नेत्यांना राज्यसभेवर संधी देणे आवश्यक होते. त्यांच्यावर भाजपाचाही विश्वास नाही, या कात्रीत अजितदादा व त्यांचा राष्ट्रवादी पक्ष अडकला आहे, असे दिसते.

## जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

- ☆ मिळकट नोटीस
- ☆ हस्तांतर करार नोटीस
- ☆ नोंदणी न्यास नोटीस
- ☆ निविदा जाहिरातीसाठी
- ☆ तहसिल जाहीरनामा
- ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क :दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022-25379944, +91-9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

### रिक्षा–टॅक्सी चालकांसाठी स्वतंत्र महामंडळ

**(पान १ वरून)** मालक कल्याणकारी महामंडळ' सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दररोज कमावून पोट भरणाऱ्या कष्टकरी वर्गाला दिलासा मिळावा यासाठी हे महामंडळ सुरू करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले. मात्र एकेकाळी स्वतः रिक्षाचालक असलेल्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या कार्यकाळात रिक्षा आणि टॅक्सी चालकांना आपल्यावतीने दिलेले ही अनोखी भेट ठरली आहे.

### मेधा पाटकर यांचे उपोषण थांबवण्यासाठी न्याय मागण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शन

**(पान ३ वरून)** कायदे, धोरणे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पूर्ण पालन करून सर्व प्रकल्प बाधितांचे पुनर्वसन करा., रिक्त पदांवर पुनर्वसन अधिकारी आणि तक्रार निवारण प्राधिकरण, मध्य प्रदेशच्या माननीय सदस्यांची लवकरात लवकर नियुक्ती करा., वरील कामे पूर्ण होईपर्यंत सरदार सरोवरची पाण्याची पातळी १२२ मीटर (क्रेस्ट लेव्हल) राखा, १७ मीटरचे दरवाजे उघडे ठेवा.

वरील मागण्या घेऊन आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालया समोर निदर्शन करण्यात आली , या वेळी जगदीश खैरालिया, राष्ट्रीय सरचिटणीस, श्रमिक जनता संघ, डॉ. संजय मंगला गोपाळ, राष्ट्रीय समन्वयक, जन आंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय, राजेंद्र चव्हाण, ठाणे लोकसभा समन्वयक, भारत जोडो अभियान, नरेश भागवाने, महासचिव, बहुजन विकास संघ, लिलेश्र्वर बनसोडे, निमंत्रक, कामगार कर्मचारी संयुक्त कृती समिति, निर्मला पवार, भारतीय महिला फेडरेशन, सुब्रतो भट्टाचार्य स्वराज अभियान, ठाणे हर्षलता कदम, अध्यक्ष, समता विचार प्रसारक संस्था, नितीन देशपांडे उपाध्यक्ष, धर्मराज्य पक्ष ह्या संस्था संघटना सहभागी झाले होते.

### ओल्या व सुक्या कचऱ्याच्या विल्हेवाट जागेवरच!

**(पान ३ वरून)** तिथे खताचा पर्यावरणसुलभ वापर करता येईल. तसंच मोठ्या मध्यवर्ती भागामध्ये झाडांसाठी तेथील गार्डन डिपार्टमेंटला हे खत दिलं जाईल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी टोगो व्हॅन कचरा प्रकल्पासाठी निधी दिला होता. त्यामधून ह्या दोन टोगो व्हॅन घेतलेल्या आहेत. महाराष्ट्रात अशी टोगो व्हॅन चालवणारी ठाणे महापालिका पहिलीच असून, राज्यात असा प्रकल्प पहिल्यादांच होतो आहे, अशी माहीती प्रताप सरनाईक यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

### भाज्या महागल्या

**(पान ३ वरून)** भाज्यांची आवक घटली आहे. भाज्यांची आवक घटल्यामुळे त्यांच्या दरात गेल्या आठवड्याभरापासून मोठी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात १० ते २० रुपयांनी तर, किरकोळ बाजारात दुपटीने भाज्यांचे दर वाढले आहेत. भेंडी, गवार, शिमला मिरची, तोंडली या भाज्यांनी किरकोळ बाजारात थेट शंभरी गाठली आहे.

वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये राज्यात विविध भागांतून दररोज ५५० ते ६०० भाज्यांच्या गाड्यांची आवक होत असते. यामध्ये पुणे आणि नाशिक जिल्ह्यातून येणाऱ्या गाड्यांची संख्या मोठी असते. गेल्या आठवड्याभरापासून गाड्यांच्या संख्येत घट झाली आहे. सध्या केवळ ४०० ते ४५० भाज्यांच्या गाड्या बाजारात दाखल होत आहे. त्यामुळे भाज्यांच्या दरात १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे, असे कृषी उत्त्पन्न बाजार समितीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

### मा. नगरसेविका सौ. रागिणीताई बैरीशेट्टी यांच्यावतीने

## रविवारी ज्येष्ठ व विधवा महिलांसाठी मोफत छत्री वाटप !



ठाणे – स्थानिक माजी नगरसेविका सौ रागिणीताई बैरीशेट्टी यांच्यावतीने शिवाई नगर परिसरातील सर्व विभागामधील, वय ६५ वर्षांवरील ज्येष्ठ महिला आणि विधवा महिला यांच्यासाठी छत्रीवाटप कार्यक्रमाचे आयोजन रविवारी २३ जून रोजी करण्यात आल्याची माहिती सामाजिक बांधिलकी जपणारे सच्चे समाजसेवक श्री भास्कर बैरीशेट्टी यांनी दिली आहे.

पावसाळा सुरू होत आहे. पावसापाण्यात महिलांना संरक्षण मिळावे या हेतुने स्थानिक माजी नगरसेविका सौ रागिणीताई भास्कर बैरीशेट्टी यांच्यावतीने शिवाई नगर परिसरातील सर्व विभागामधील, वय ६५ वर्षांवरील ज्येष्ठ महिला आणि विधवा महिला यांच्यासाठी छत्रीवाटप कार्यक्रमाचे आयोजन रविवारी, २३ जून २०२४ रोजी,सायंकाळी ७ वाजता, जनसंपर्क कार्यालय, उपवन सोसायटी, शिवाई नगर शिवसेना शाखेजवळ, ठाणे (प) येथे करण्यात आले करण्यात आले आहे. छत्री वाटप कार्यक्रमध्ये जो उपस्थित राहील आणि कूपन आणेल त्यालाच छत्री मिळेल. छत्री वाटपाची कूपन जनसंपर्क कार्यालय येथून घेऊन जाणे. कूपन शिवाय छत्री दिली जाणार नाही. एका व्यक्तीला एकच कूपन दिले जाईल आणि एका व्यक्तीला एक कूपन एक छत्री दिली जाईल. एका कूपन व्यतिरिक्त दुसरे कूपन आणले तर छत्री मिळणार नाही. कार्यक्रमानंतर कूपन आणल्यास छत्री मिळणार नाही, याची नोंद घ्यावी, तरी या छत्रीवाटप कार्यक्रमास महिलांनी मोठ्यासंखेने उपस्थित रहावे असे आवाहन स्थानिक कार्यसम्राट माजी नगरसेविका सौ. रागिणीताई भास्कर बैरीशेट्टी व सामाजिक बांधिलकी जपणारे सच्चे समाजसेवक श्री भास्कर बैरीशेट्टी यांनी केले आहे.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाडूच्याच श्री गणेशमूर्ती बनवून महापालिकेस सहकार्य करावे!

**कल्याण – यावर्षी संपन्न होणाऱ्या गणेशोत्सवासाठी मूर्तीकारांनी केवळ शाडूच्याच श्रीगणेशमूर्ती तयार कराव्यात असे स्पष्ट प्रतिपादन महापालिकेच्या पर्यावरण प्रदूषण नियंत्रण विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी केले .मा. केंद्रीय केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांच्याकडील सुधारित मार्गदर्शक सूचनानुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आलेली आहे, या पार्श्वभूमीवर कल्याणच्या आचार्य अत्रे रंग मंदिरात कारखानदार व मूर्ती विक्रेते यांचे समवेत संपन्न झालेल्या बैठकीत उपायुक्त अतुल पाटील यांनी हे स्पष्ट प्रतिपादन केले.**




कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात मूर्ती बनवणारे कारागीर, मूर्तिकार व उत्पादक यांना पीओपी पासून मूर्ती तयार करण्यावर बंदी घालण्याचे आवाहन यापूर्वीही महापालिकेमार्फत करण्यात आले होते.मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनानुसार महापालिका कार्यक्षेत्रात केवळ पर्यावरण मूर्तींचे उत्पादन व विक्री करण्यास मान्यता देण्याबाबत कळविले असल्याची असल्याची माहिती या बैठकीत उपायुक्त अतुल पाटील यांनी दिली.

या बैठकीत उपस्थित कारागीर/ मूर्तिकारांना त्यांनी केवळ पर्यावरण पूरक– मातीच्या व नैसर्गिक रंग वापरून पाण्यात सहज विरघळणाऱ्या मातीच्या मूर्तींची निर्मिती व विक्री करणे बाबत सकत सूचना देण्यात आल्या. मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनानुसार महापालिका क्षेत्रात मूर्ती बनविणे अथवा विक्री करण्यासाठी महानगरपालिकेकडे नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी न केलेले कारागीर मूर्तिकार व उत्पादक यांना महानगरपालिका क्षेत्रात मूर्ती विक्री स्टॉलला महापालिकेमार्फत परवानगी देण्यात येणार नाही असेही या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

प्रत्येक प्रभागात उपलब्ध असलेल्या जागेनुसार प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वानुसार केवळ पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांना आवश्यक पुरेशी शाडू माती आणि जागा उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन उपायुक्त अतुल पाटील यांनी या बैठकीत दिले.

या बैठकीस उपस्थित असलेले कार्यकारी अभियंता प्रमोद मोरे, पर्यावरण कार्यकर्ता रोहित जोशी ,मनूसृष्टी पर्यावरण कन्सल्टन्सीच्या वैशाली तांबट यांनी पीओपीच्या मूर्तीमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानी बाबतची, जलप्रदूषणाबाबतची माहिती उपस्थितांसमोर सादर केली.

## महापालिका मुख्यालयात आपत्ती व्यवस्थापन कामाकाजाचा आयुक्तांनी घेतला आढावा

पनवेल – पावसाळी कालावधीत आपत्ती ओढावू नये यासाठी महापालिका हद्दीतील विविध आस्थापनांशी निगडीत आपत्ती व्यवस्थापन कामकाजाचा आढावा आज दिनांक १८ जून रोजी मुख्यालयात घेतलेल्या बैठकित आयुक्त तथा प्रशासक श्री.मंगेश चितळे यांनी घेतला.

यावेळी उपायुक्त कैलास गावडे, उपअभियंता सुधीर, विद्युत विभाग व मलनिस्सारण विभाग प्रमुख प्रितम पाटील, एमएसआरडीसीचक उप अभियंता एम.डी. काजरेकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल पाटील, पोलिस निरीक्षक अजय कांबळे, बी.के लोंढे, डी.एस. होडगे, सलिम तोडवी, ग्रामपंचायत सदस्य कोळखे, जे.सी चवरकर, अभिजीत सुरते, ग्रामविकास विभाग पळस्पेचे सुदिन पाटील, आयआरबीचे प्रतिनिधी सचिन देवरे , आपत्ती विभाग प्रमुख दशरथ भंडारी ,मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, अरूण कांबळे, पालिका अधिकारी उपस्थित होते.

आपत्ती व्यवस्थापन बैठक आयुक्त महोदयांनी मागील आठवड्यात घेण्यात आली होती. मात्र या बैठकीमध्ये ओ.एन.जी.सी. ब्रीजखाली साठणाऱ्या पाण्याचा योग्य निचरा होण्याच्या दृष्टीने एम.एस.आर.डी.सी. यांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यामुळे त्या विभागाशी निगडीत असलेली कामे पुर्ण होण्यासाठी आज मुख्यालयातील बैठक सभागृहामध्ये बैठकिचे आयोजन करण्यात आले.

यावेळी ओ .एन.जी.सी. ब्रीजखाली पाणी साठणाऱ्या पाण्यावरती कायमस्वरूपी तोडगा काढण्यावरती चर्चा करण्यात आली. तसेच सध्या पावसाळ्यामध्ये त्याठिकाणी करण्यात आलेल्या उपाय योजनांचा आढावा घेतला. तसेच महापालिका कार्यक्षेत्रातील एम.एस. आर.डी.सी.अंतर्गत पाणी साठणाऱ्या विविध ठिकाणी संयुक्त पहाणी करून उपाययोजना करण्याबाबत यावेळी आयुक्तांनी सूचना दिल्या.

महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ब्रीजवरील खड्डे भरण्याविषयी एम.एस.आर. डी.सीला आयुक्तांनी सूचना दिल्या. अमरधाम स्मशानभूमी येथे पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी केलेल्या कामकाजाची पाहणी करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी सूचना दिल्या. या अनुषंगाने येणाऱ्या विविध विषयांवरती यावेळी चर्चा करण्यात आली.

**महापालिकेच्या नव्या मुख्यालयासमोरील दोन रस्त्यांमधील त्रिकोणी जागेचे सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्यावतीने एम.एस.आर.डी.सी.ला परवानगीसाठी प्रस्ताव करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.**




■ ठाण्यात सर्वात जुनी शाळा गौतम हिंदी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय १९६० पासून असणारी या शाळेच्या भूमीपूजन १९९२ साली वंदनीय धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्याहस्ते झाला होता. या शाळेत १८ जून २०२४ रोजी बालवाडी ते दहवीच्या विद्यार्थींना खाऊ बिस्किट व अभ्यास लागणारे सर्व सामग्री श्री जितु शर्मा यांच्यातर्फे वाटप करण्यात आले. तेव्हा त्यांच्याबरोबर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कामयानी सप्रेम ठाकूर, बिंदु मिश्रा, अभय पाटील, प्रियंका राणे, मिस शीला, मिस सुनीता सिंह, सुमित्रा सिंह, दीपश्री गवले, गीता सिंह, अंजू सिंह, प्रेमा जैस्वाल, संजय भागवत, विजय सिंह, दुर्गेश सिंह व शाळेतल्या सर्व स्टाफ उपस्थित होते.

## शेअर ट्रेडिंगच्या बहाण्याने २.८ कोटीचा गंडा, अज्ञात इसमाच्या विरोधात गुन्हा दाखल

ठाणे – शेअर ट्रेडिंग करून जास्त नफा मिळवण्याची लालसेपोटी अज्ञात इसमाने ७० वर्षीय तक्रारदार इंद्रनाथ जीतेंद्रनाथ मजुमदार यांना लिंक पाठवून शेयरच्या गुंतवणुकीसाठी प्रवृत्त करीत तब्बल २ कोटी ८ लाख ६३ हजार ३०० रूपयांचा आर्थिक गंडा घातल्याच्या तक्रारी एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार अर्ज केले. त्यानुसार कापुरबवडी पोलिस ठाण्यात तक्रारदार यांनी दाखल केली. कापुरबावडी पूलिसांनी आर्थिक फसवणूक प्रकरणी अज्ञात इसमाच्या विरोधात शनिवारी (ता–१५ जून) रोजी दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार इंद्रनाथ जीतेंद्रनाथ मजुमदार (७०) रा. १९०३, विंग २३ , लोढा अमारा, कोलशेत, ठाणे(प) यांचे मुंबईच्या उछभू परिसर नरीमन पॉइंट येथे कार्यालय आहे. त्यांची एचडीएफसी आणि डीसीबी बँकेत खाती असून याच खात्याच्या माध्यमातून तक्रारदार मुजमदार हे आरटीजीएस आणि आयएमपीएस सारखे ऑनलाइन व्यवहार करतात. त्यांच्या मोबाईलवर अज्ञात इसम रवी सिंग याने ६ एप्रिल, २०२४ रोजी पेअर ट्रेडिंग बाबत त्यांना मार्गदर्शन केले. आणि त्यांना एक लिंक पाठविली. सदर लिंकच्या व्हाट्सअप ग्रुपवर शेअर मारकिंगबाबत मार्गदर्शन करीत असून आपण अमेरिकन कंपनीत असल्याचे संगितले. ग्रुप अड्मिन मेटॉर यांनी विविध मोबाइलवरून तक्रारदार यांच्याशी संपर्क केला. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली तक्रारदार यांनी २ कोटी ८ लाख ६३ हजार ३०० रूपयांची गुंतवणूक केली. त्या मोबदल्यात मिळणारी रक्कम ३ कोटी ५४ लाख ६३ हजार २०५ इटली असलायचे कंपांनीच्या वेबसाइटवर दिसत होते. मात्र ती देण्यास नकार देत ग्रुप एडमिन मेटॉर, रवि सिंग व ग्रुप असिस्टंट आमीन हे शेअर ट्रेडिंग करण्यासाठी आणखी ७० लाख ९२ हजार ६४२ रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तक्रारी केल्या आणि कापुरबावडी पोलिस ठाण्यात अज्ञाताच्या विरोधात गुन्हा नोंदविला. पोलिस अधिक तपास करीत आहेत

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

**Public Notice**

Service Request Number : THN/01119/18/24
Inquiry/case No. : ACC/I/280/2024
Name of the Trust : ॲनिमल वेल्फेअर ट्रस्ट
**Address of the Trust : एच नं. ०२४८/४०२, क्रिष्णा निवास, सेक्टर –९, दिवा गाव, ऐरोली, नवी मुंबई, ठाणे, ठाणे, ठाणे**
**Name of the Applicant : श्रीमती रुही सुधीर वर्दे**

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 10/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

### जाहीर नोटीस

आमचे अशील सुनीता बाळासाहेब राजदेव व आकाश बाळासाहेब राजदेव यांच्यावतीने आम्ही तमाम जनतेला कळवितो की, आमच्या अशिलांनी पुढे वर्णन केलेली सदनिका विकत घेतली आहे त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे: सदनिका नंबर ३०६, तिसरा मजला, ए विंग, क्षेत्रफळ २६९ चौरस फूट ओमश्री साई धाम एसआरए को ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लिमिटेड असल्फा विलेज, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, मुंबई महाराष्ट्र ( यापुढे सदर सदनिका असा उल्लेख असल्यास वेगळा उल्लेख नसल्यास वर वर्णन केलेली सदनिका ) सदर सदनिकेच हलफल सिंह हे मूळ मालक होते त्यांचे २१/११/२००६ रोजी निधन झाले त्यांच्या पश्चात त्यांना श्रीमती सावित्री हलफल सिंह पत्नी, श्री सतीश हलफल सिंह मुलगा, श्री सर्वेश हलफल सिंह मुलगा, श्रीमती संगीता आशिष सिंग मुलगी, श्रीमती संतोष देवी शिवकुमार सिंह मुलगी, श्रीमती सरोज अवदेश सिंह मुलगी एवढेच वारस असून अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच त्यांच्या सर्व मुलांनी सदर सदनिकेवरील त्यांचा हक्क नोंदणीकृत हक्कसोडपत्राद्वारे त्यांच्या आईच्या नावे म्हणजेज श्रीमती सावित्री हलफल सिंह यांच्या नावे सोडला आहे, त्यानंतर श्रीमती सावित्री हलफल सिंह यानी सदर सदनिका आमच्या अशिलांना नोंदणीकृत करारनाम्याद्वारे विकली आहे आता आमचे अशील सदर सदनिकेवर कर्ज घेऊ इच्छितात.

तरी सदर सदनिकेच्या अनुषंगाने अन्य कोणी वारस असल्यास अथवा कुणाची हरकत असेल किंवा त्यांचा वारसाहक्काच्या अनुषंगाने कोणत्या हरकती असतील अथवा सदर सदनिकेच्या अनुषंगाने कुणाचे कसलेही उदाहरणार्थ तारण गहाण दान बोजा पोटगी इत्यादी असतील किंवा त्यासंबंधी कुणालाही लेखी म्हणणे सादर करायचे असेल तर ते कागदोपत्री पुराव्यासह पुढील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांचे आत सादर करावी विहित मुदतीनंतर मिळालेल्या हरकती अथवा दाव्यांची दखल घेतली जाणार नाही तसेच सदर हक्क आपण स्वखुशीने सोडून दिले आहे असे समजले जाईल.

वर उल्लेख केलेल्या सदनिकेच्या अनुषंगाने काही संपर्क साधण्यासाठीचा पत्ता पुढे दिला आहे ही जाहीर नोटीस जनहितार्थ प्रसिद्ध केली आहे.

सही/–
(मंजिरी देशमुख (घैसास)
वकील उच्च न्यायालय

संपर्काचा पत्ता :– २/–, चंदन सोसायटी, कीर्तीकर कंपाऊंड
नूरी बाबा दर्गा रोड, मखमली तलावाजवळ ठाणे ( पश्चिम ) ४००६०१
भ्रमणध्वनी क्रमांक :– ९८६९२८३३२४, ९८६९०८०७१४

धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे
पत्ता– ३ ते ६ मजला, वेस्ट व्ह्यू बिल्डींग,
गजानन महाराज मंदिरा जवळ,
राम मारुती रोड, ठाणे (प.) ४०० ६०२
email: supdtest.th-mh@gov.in

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अर्ज क्रमांक :
सार्वजनिक न्यासाचे नाव : **श्री भैरवनाथ चॅरिटेबल ट्रस्ट**
न्यास नोंदणी क्रमांक : **ई/९५८३/१५/ठाणे**
अर्जदार श्री./श्रीमती : **श्री. अविनाश पोवळे**

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त –२, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या अर्जासंबंधी **मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये** चौकशी करणार आहेत :–

१) श्री. सुधाकर मधुकर मोरे
२) श्री. मोहन परमानन्द गौर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा द्यावयाचा असेल त्यांनी त्यांची कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वर नमूद पत्त्यावर प्राप्त होईल, अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग, ठाणे यांचे शिक्यानिशी आज दिनांक २१–०५–२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/–
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales- RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत

■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव
वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

## होलमार्किंग करण्यासाठी दिलेले ४.९० लखांचे दागिने घेऊन नोकर झाला पसार

ठाणे - ठाण्यातील कोलशेत परिसरातील बेन्डा जेम्स एण्ड ज्वेलरी दुकानात काम करणार्या ४१ वर्षीय कुलदीप सिंग रावत याला ४ लाख ९० हजार ३० रुपयांचे सोन्याचे दागिने हॉलमार्किंग करण्याकरिता रविवारी (ता-१६ जून) रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास पाठविले. सदर दागिने घेऊन नौकर फरार झाल्याची तक्रार कापुरबवडी पोलिस ठाण्यात तक्रारदार आशिष बन्सीलाल जैन (४१) यांनी नौकर कुलदीप रावत याच्या विरोधात सोमवारी(ता-१७ जून) रोजी नोंदविली. कापुरबावडी पोलिस अधिक तपास करीत आहे.

तक्रारदार आशिष बन्सीलाल जैन(४१) रा. एव्हरेस्ट वाल्ड स्पेन बिल्डिंग फ्लॅट नं. २००१ गेट नं. ४ कोलशेत रोड ठाणे पश्चिम यांचे बेन्डा जेम्स एण्ड ज्वेलरी नावाचे दुकान प्लेटिना एलाईट बिल्डिंग शॉप नं.९ कोलशेत रोड ठाणे(प) येथे आहे. या दुकानात पुष्पेद्र सिंग चैहान (२५) हा गेले सहा महिन्यापासुन काम करतो.दिवेश जैन (२२) हा गेले दोन महिन्यापासून काम करतो. भगवत सिंग राठोड (२१) हा गेले एक महिन्यापासुन काम करतो तर कुलदीप सिंग रावत (१०) रा. धर्मवीरनगर एस. आर. ए. बिल्डिंग नं. १ रूम नं. ७१० तुलसीधाम ठाणे (प) हे चार कर्मचारी काम करतात. यापैकी कुलदीप रावत याला रविवारी दुपारी १२-१० वाजण्याच्या सुमारास ४ लाख ९० हजाराचे सोन्याचे दागिने हॉलमार्किंग करण्याकरिता दिले. ते घेऊन कुलदीप सिंग हा फरार झाला. तक्रारदार याने याबाबत हॉलमार्किंग करण्याच्या ठिकाणी ही चौकशी केल्यानंतर दागिने हॉलमार्किंग करून घेऊन गेल्याचे समोर आले. तक्रारदार आशीष बंसीलाल जैन यांनी कापुरबवडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## मुंबई-नाशिक महामार्गावर एल.पी.गॅस टँकर उलटला

ठाणे - ठाण्याच्या मुंबई-नाशिक महामार्गावर नाशिककडे जाणार्या वाहिनीवर भारत पेट्रोलियम कंपनीचा एलपी गॅस घेऊन निघालेल्या टँकरचे नियंत्रण सुटल्याने टँकर पलटी झाल्याची घटना मंगळवारी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे वाहतुकीचा चक्काजाम झाला होता. तर टँकर चालक संतोष यादव (२६) हा किरकोळ जखमी झाला. मंगळवारी दुपारी ठाण्याच्या मुंबई नाशिक महामार्गावरून एलपी गॅस घेऊन कलोंबली ते नाशिक असा प्रवास करणार्या आणि १८ टन एलपी गॅस घेऊन जाणार्या टँकर चालकाचे नियंत्रण सुटल्याने संतोष यादव(२६) रा. कळोबली याच्या उजव्या पायाला आणि हाताला किरकोळ दुखापत झाली. त्याला त्वरित अग्निशमन दलाच्या जवानांनी रुग्णालयात नेऊन प्राथमिक उपचार केले. घटनास्थळी कळवा पोलीस स्थानकाचे पोलीस कर्मचारी, शहर वाहतूक पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## मेधा पाटकर यांचे उपोषण थांबवण्यासाठी न्याय मागण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शन




ठाणे -: १८ जून, नर्मदा बचओ आंदोलांनाच्या वतीने नर्मदा खोऱ्यात बेमुदत आंदोलन पुन्हा सुरू झाले आहे. आंदोलनाच्या नेत्या मा. मेधाताई पाटकर यांनी आपल्या सहकार्यांसह दि, १५ जून २०२४ पासून बेमुदत उपोषण सुरू केले आहे. बेदखल झालेल्या प्रतिनिधींचे साखळी उपोषण सुरू आहे. आंदोलक काही हजार लोक त्यांच्या पुनर्वसनाच्या हक्कावर ठाम आहेत, सरदार सरोवर धरणाची पाणीपातळी १२२ एमएसवर कायम ठेवा ही त्यांची प्रमुख मागणी आहे. कायद्याचे आणि धोरणाचे उल्लंघन करून, निमाड, मध्य प्रदेशच्या मैदानी भागातील वरची गावे आणि एका टाऊनशीपसाठी बॅकवॉटरची पातळी बदलण्यात आली. पात्र कुटुंबांच्या यादीतून १५९४६ कुटुंबांना वगळण्यात आले.

केंद्रीय जल आयोगाने १९८४ मध्ये अंदाजित केलेली आणि २०२३ मध्ये ती बरोबर असल्याचे सिध्द झालेली बॅकवॉटरची पातळी ( जुनी ) स्वीकारा., बेकायदेशीरता आणि अनियमिततेमुळे घरे, शेते, गुरेढोरे, माणसे आणि सर्व मालमत्तेचे २०२३ मध्ये झालेल्या नुकसानाची बाजारमूल्याने भरपाई द्या., (पान २ वर)

## स्वच्छतेच्या दिशेने एक पाऊल

# ओल्या व सुक्या कचऱ्याच्या विल्हेवाट जागेवरच!


(छाया-अशोक घाग/मनोज सिंह)




**कचऱ्यांला डंम्पिंग ग्राऊंडवर नेण्याची गरज नाही...**

**ओवळा मजिवडा मतदारसंघात ५० टोगो व्हॅन मिळणार**

ठाणे - ओल्या व सुक्या कचऱ्याच्या विल्हेवाटीची जागेवरच सुविधा असलेल्या अद्ययावत टोगो व्हॅन ओवळा माजिवडा मतदारसंघाला देण्याचे नियोजन असून दोन टोगो व्हॅन यापूर्वीच शहराच्या सेवेत दाखल झाल्या आहेत. आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रयत्नातून ही अद्ययावत सेवा चालवणारी ठाणे महापालिका ही महाराष्ट्रातील पहिलीच आहे.
ठाणे शहराला स्वच्छ व सुंदर ठेवण्याच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा उपक्रम आमदार प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघात राबवायला घेतलाय. कचऱ्याची व्हिलेवाट जागेवरच होऊ शकेल व आपल्या मतदार संघातील कचरा हा डंम्पिग ग्राउंडवर जाणार नाही.
कचऱ्याचे वर्गीकरण करून ओला कचरा व सुका कचरा असं त्याचं वर्गीकरण करून कचऱ्याची योग्य व्हिलेवाट लावण्यात येईल व कचऱ्याचे खतात रूपांतर होईल. यासाठी अत्याधुनिक टोगो व्हॅन लोकांच्या सेवेत देण्यात येतेय. या टोगो व्हॅन मध्ये कचरा परस्पर टाकल्यावर लगेच ओला कचरा आणि सुखा कचरा वेगवेगळा केला जातो. त्या कचऱ्याचे तिथल्या तिथेच खतामध्ये रूपांतर होते. प्रायोगिक तत्वावर दोन टोगो व्हॅन मतदारसंघासाठी देण्यात आलेल्या असून, आमदार प्रताप सरनाईक यांनी टोगो व्हॅनचे प्रात्येक्षिक आज पत्रकार परिषदेत दाखवले. त्यांनी विधानसभा निवडणूकीच्या आधी आचारसंहिता लागण्यापूर्वी लोकांच्या सेवेत टोगो व्हॅन दिलेल्या आहेत. भविष्यात ओवळा माजिवडा मतदारसंघासाठी ५० व्हॅन देणार आहेत. जेणेकरून कचऱ्याची व्हिलेवाट जागेवरच होऊ शकेल आणि आपल्या मतदारसंघातील कचरा हा डंम्पिग ग्राउंडवर जाणार नाही. कचऱ्याचे खतात रूपांतर झाल्याने मतदारसंघातील जी उद्यानं आहेत किंवा दुतर्फा सुशोभित झाडं आहेत तसेच ज्या ज्या ठिकाणी लॅण्डस्केप केलेले आहेत, (पान २ वर)

## शिक्षकांसह सर्व स्तरातील संघटनांचा आमदार निरंजन डावखरे यांना पाठिंबा



ठाणे - कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आमदार निरंजन वसंत डावखरे यांना कोकणातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबरच विविध स्तरांतील संघटना व समाजघटकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. कोकणातील सुविधांबरोबरच पदवीधर-स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांसाठी आमदार डावखरे यांनी १२ वर्षांत सातत्याने आवाज उठविल्याबद्दल संघटनांकडून आभार मानण्यात आले. तसेच या निवडणुकीत पाठिंबा जाहीर करून बहुमताने निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.
विधान परिषदेच्या निवडणुकीत कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाचे उमेदवार निरंजन डावखरे यांना महायुतीतील सर्व घटक पक्षांचा पाठिंबा मिळाला आहे. भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई (आठवले) पक्षांबरोबरच मनसेनेही आपला उमेदवार मागे घेऊन निरंजन डावखरे यांना साथ दिली. ठाण्यात नुकत्याच झालेल्या भव्य मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पहिल्याच फेरीत विजय मिळविण्याचा निश्चय करण्यात आला. त्याचबरोबर कार्यकर्त्यांना कामाला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. महायुतीच्या कार्यकर्त्यांबरोबरच विविध संघटनाही डावखरेंच्या पाठीशी उभ्या राहिल्या आहेत.
कोकण शिक्षक मतदारसंघातील माजी आमदार दिवंगत रामनाथ मोते यांची महाराष्ट्र राज्य शिक्षण क्रांती संघटना, भाजपाचे आमदार किसन कथोरे संस्थापक असलेली महाराष्ट्र राज्य स्वाभिमान प्राथमिक शिक्षक संघ यांच्यापाठोपाठ भाजपाचे विद्यमान शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेनेही आमदार डावखरे यांना पाठिंबा जाहीर केला. शिवसेनेच्या आमदार मनीषा कायंदे यांच्या मार्गदर्शनाखालील महाराष्ट्र धर्मनिरपेक्ष शिक्षक संघटनेचे (मस्ट) डॉ. विजय पवार, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ व राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे (२६ संस्थांचे फेडरेशन) राज्याध्यक्ष केशवराव जाधव, महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज् असोसिएशनचे (मेस्टा) ठाणे जिल्हाध्यक्ष नरेश पवार, अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे अध्यक्ष डॉ. आर. बी. सिंह, खान्देश सेनेचे अध्यक्ष सुहास बोंडे, ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघ, ठाणे जिल्हा कला अध्यापक संघ, पदवीधर माजी विद्यार्थी शिक्षक पालक संस्था आदी संघटनांनी पाठिंब्याची पत्रे आमदार डावखरे यांना सोपविली.

# भाज्या महागल्या | वातावरण बदलाचा फटका

**ठाणे – जून महिन्यात पावसाला सुरुवात झाली असली तरी, पुरेशा प्रमाणात पाऊस पडत नसल्यामुळे वातावरणात उकाडा कायम आहे. वातावरणातील या बदलांमुळे नागरिक हैराण झाले असतानाच, त्यापाठोपाठ आता, भाज्या आणि पालेभाज्यांच्या पिकांवर परिणाम होऊन त्याची आवक घटल्याचे दिसून येत आहे. परिणामी, गेल्या आठवड्याभरापासून भाज्यांच्या दरात वाढ झाल्याचे चित्र आहे. काही भाज्यांनी किरकोळ बाजारात थेट शंभरी गाठली आहे. येत्या काही दिवसात भाज्यांच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता किरकोळ विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.**

जून महिन्याच्या पंधरावड्यानंतर अपेक्षित पावसाला सुरुवात झालेली नाही. दिवसभरात अर्ध्या तासांच्यावर पाऊस पडत नाही. पाऊस पडल्यानंतर पुन्हा ऊन पडते. सलग पाऊस पडत नसल्याने वातावरणात मोठे बदल झाले असून उकाडा वाढल्याने नागरिकांच्या अंगाची काहिली होत आहे. अधूनमधून पडणाऱ्या पावसाच्या हलक्या सरी आणि त्यानंतर पडणारे कडक उन या बदलत्या वातावरणाचा परिणाम भाज्यांच्या पिकांवर होऊ लागला आहे. यामुळे गेल्या आठवड्याभरापासून भाज्यांच्या दरात वाढ झाल्याचे चित्र आहे. काही भाज्यांनी किरकोळ बाजारात थेट शंभरी गाठली आहे. येत्या काही दिवसात भाज्यांच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता किरकोळ विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.
वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीत राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच इतर राज्यातून भाज्या विक्रीसाठी दाखल होत असतात. सर्वाधिक भाज्या या पुणे आणि नाशिक जिल्ह्यातून येतात. परंतु, या वातावरणातील बदलाचा परिणाम भाज्यांच्या पिकांवर झाला आहे. उकाड्यामुळे भाज्यांचे पीक खराब झाले असून बाजारात (पान २ वर)



### व्यापाऱ्यांचे म्हणणे

राज्यात सलग आणि मुबलक प्रमाणात पावसाला सुरुवात झालेली नाही. अद्यापही उन्हाच्या झळा नागरिकांना सोसाव्या लगत आहे. त्याचा परिणाम, भाज्यांच्या पिकांनाही बसला असून कडक उन्हामुळे भाज्यांची पिके खराब झाली आहेत. त्यामुळे बाजारात भाज्यांची आवक घटून त्यांच्या दरात वाढ झाली आहे. पाऊस नियमितपणे सुरु झाल्यानंतर भाज्यांची आवक सुरळित होण्याची शक्यता आहे, अशी माहिती वाशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील भाजी व्यापारी नाना बोरकर यांनी दिली.

### भाज्यांचे दर (प्रति किलो)

| भाज्या घाऊक | ८ दिवसापूर्वी | आता | किरकोळ | ८ दिवसापूर्वी | आता |
|---|---|---|---|---|---|
| भेंडी | - ४४ | - ४८ | भेंडी | - ८० | - १०० |
| फरसबी | - ८० | - १०० | फरसबी | - १०० | - १२० |
| गवार | - ५० | - ९० | गवार | - ८० | - १०० |
| शिमला मिरची | - ४२ | - ७० | शिमला मिरची | - ८० | - १०० |
| वांगी | - २४ | - ४० | वांगी | - ४० | - ६० |
| पडवळ | - ३८ | - ६० | पडवळ | - ६० | - ८० |
| तोंडली | - ४० | - ५० | तोंडली | - ८० | - १०० |
| टोमॅटो | - २२ | - ४० | टोमॅटो | - ५० | - ८० |

### पालेभाज्यांच्या दरातही वाढ

या वातावरणामुळे पालेभाज्यांचेही मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून त्यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात १५ ते २० रुपयाने विक्री केली जाणारी मेथीची जुडी ३५ ते ४० रुपयांनी विक्री केली जात आहे. तर, पालकची जुडी ५० रुपयाने विक्री केली जात आहे. कोथिंबीरीच्या जुडीने थेट शंभरी गाठली आहे, अशी माहिती ठाण्यातील किरकोळ भाजी विक्रेते विनोद जयस्वाल यांनी दिली



रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले यांची तिसऱ्यांदा सामाजिक न्याय राज्यमंत्री पदी केंद्रात वर्णी लागल्याने रामदास आठवले पुणे दौऱ्यावर जात असताना रिपाई पनवेल शहर महानगरपालिका अध्यक्ष प्रभाकर कांबळे मंगेश धिवार, गौतम पाटेकर नेते सुमित मोरे, रिपाइ युवा कार्यकर्ते सुरेंद्र सोरटे, रवींद्र कांबळे, प्रकाश कांबळे आदींनी आठवले साहेबांचे फटाक्यांच्या आतशाबाजीत पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा देऊन जंगी स्वागत केले.

ठाणे जिल्ह्यातील महिला बचत गटांनी शिवलेले

# शालेय गणवेश विद्यार्थ्यांना वाटप

ठाणे : समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत एक राज्य एक गणवेश योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. याअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील गणवेश शिलाईचे काम महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ठाणे जिल्ह्यातील बचत गटांना मिळाले आहे. जिल्ह्यातील बालकांच्या अंगावर जिल्ह्यातील महिला बचत गटांनी शिवलेले गणवेश दिसणार आहेत. जिल्ह्यासाठी एकूण सुमारे १,०४,७०३ गणवेश शिलाई करण्यात येणार असून शाळेच्या पहिल्या दिवशी १५ जून रोजी ग्रामीण भागातील १२०१ विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले आहे.



## ठाणे जिल्ह्यातील बचत गटांमार्फत 1,04,703 गणवेश होणार तयार

राज्य शासनाने समग्र शिक्षा कार्यक्रम अंतर्गत एक राज्य एक गणवेश योजना सुरू केली आहे. त्याअंतर्गत राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत वाटप करावयाच्या मोफत गणवेशाच्या शिलाई करण्याचे काम महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत येणाऱ्या बचत गटातील महिलांना मिळाले असून यातून बचत गटाच्या महिलांना रोजगारची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यानुसार ठाणे जिल्ह्यात एकूण १०४७०३ गणवेश शिवणकाम बचत गटाच्या महिलांच्या माध्यमातून पूर्ण होत आहे.

यंदाच्या वर्षी शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दि. १५ जून २०२४ रोजी मोफत गणवेश योजनेअंतर्गत भिवंडी, शहापूर, कल्याण, मुरबाड व अंबरनाथ या ६ तालुक्यामधील एकूण ६ केंद्र शाळेतील १२०१ विद्यार्थ्यांचे गणवेश पोहोच करण्यात आले. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रथम दिवशी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी छायादेवी सिसोदे यांच्या शुभ हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करून देऊन आनंदाची भेट देण्यात आली. यावेळी गट शिक्षण अधिकारी, मुख्याध्यापक,शिक्षक वर्ग तसेच माविम जिल्हा प्रतिनिधी व सीएमआरसीचा कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

गणवेश शिलाईचे काम महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत येणाऱ्या बचत गटांतील महिलांना मिळावे यासाठी शासन स्तरावर महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक माया पाटोळे यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच मुख्यालय स्तरावरून या उपक्रमाची अंमलबजावणी योग्यरित्या होऊन विहित वेळेत शिवणकाम पूर्ण होण्यासाठी प्रकल्प संचालक कुसुम बाळसराफ, महाव्यवस्थापक (वित्त व प्रशासन) रविंद्र सावंत, महाव्यवस्थापक (प्रकल्प) महेंद्र गमरे मेहनत घेतली. तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यात या प्रकल्पाची अंलबजवणी होऊन विद्यार्थ्यांना विहित वेळेत गणवेश पुरवठा व्हावा यासाठी कार्यक्रम व्यवस्थापक रूपा मेस्त्री, गौरी दोंदे, वित्त व लेखा अधिकारी राखी मिराशी व व्हॅल्यु चेन सल्लागार महेश कोकरे यांनी जिल्ह्यांना मार्गदर्शन केले.

गणवेश शिलाईचे कामकाज वेळेत पूर्ण करून शाळेत पोहच करण्यासाठी सर्व सीएमआरसीतील गारमेंट युनिट मोठ्या जोमाने काम करीत आहेत. ठाणे जिल्ह्यातील सीएमआरसी मार्फत कुशल महिलांना रोजगार मिळावा यासाठी महिलांची निवड करणे, त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध व्हावा यासाठी माविमचे विभागीय सल्लागार मंगेश सूर्यवंशी, माविमच्या ठाणे जिल्हा समन्वय अधिकारी श्रीमती अस्मिता मोहिते यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून हे कामकाज यशस्वीरित्या पूर्ण करत आहेत.

चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेने राबवले विशेष अभियान

# संस्थेची प्रवेश परीक्षा २३ जून रोजी, नावनोंदणीसाठी २० जूनपर्यंत संधी

**ठाणे : केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच झालेल्या पूर्व परीक्षेच्या काळात परिक्षार्थींसाठी ठाणे महापालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेने विशेष माहिती अभियान राबवले. त्यात, पूर्व परीक्षेसाठी ठाणे, मुंबई आणि नवी मुंबई शहरात विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये असलेल्या परीक्षा केंद्रांवर सर्व परीक्षार्थींना चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेची आणि प्रवेश परीक्षेची माहिती देण्यात आली.**



ठाणे, मुंबई, नवी मुंबई येथे एकूण २५ परीक्षा केंद्राबाहेर संस्थेची माहिती देण्यासाठी बुथ तयार करण्यात आले होते. या अभियानाला विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे ४९०५ परीक्षार्थींपर्यंत त्या निमित्ताने संस्थेला पोहोचण्यात यश मिळाले.

ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव भाप्रसे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपआयुक्त उमेश बिरारी आणि संचालक महादेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हे विशेष माहिती अभियान आयोजित करण्यात आले होते.

दरम्यान, रविवार, २३ जून रोजी चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेची प्रवेश परीक्षा होणार आहे. यूपीएससीची परीक्षा देणाऱ्या जास्तीत जास्त विद्यार्थी/प्रशिक्षणार्थींनी संस्थेच्या प्रवेश परीक्षेसाठी नाव नोंदणी करावी. त्यासाठी https://forms.epravesh.com/CDInstitute/ या लिंकवर गुरूवार २० जूनपर्यंत नावनोंदणी करता येईल. त्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे संचालक महादेव जगताप यांनी केले आहे.

ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोगमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना आणि इतर संलग्न परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था आहे. अशा पध्दतीने प्रशासकीय प्रशिक्षण संस्था चालविणारी देशात ठाणे महानगरपालिका ही एकमेव महानगरपालिका आहे.

# कोकण पदवीधर मतदारसंघातील पात्र मतदार कर्मचाऱ्यांसाठी २६ जून २०२४ रोजी नैमित्तिक रजा

— सहा. निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे

ठाणे : विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघासाठी येत्या २६ जून २०२४ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाकडून मतदानाचे कर्तव्य पार पाडण्यासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी कळविले आहे.

विधानपरिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निवडणुकीसाठी येत्या २६ जून २०२४ रोजी सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ठाणे जिल्ह्यात मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी मर्यादीत स्वरुपात मतदार असल्याने त्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी राज्य शासनाने कोकण विभाग पदवीधर मतदारसंघातील मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांना मतदानासाठी विशेष नैमित्तिक रजा मंजूर केली आहे. ही नैमित्तिक रजा अनुज्ञेय असलेल्या नैमित्तिक रजेव्यतिरिक्त असेल. यामुळे ठाणे जिल्ह्यातील पदवीधर मतदारसंघातील मतदार असलेल्या कर्मचाऱ्यांनी या दिवशी मोठ्या प्रमाणात आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

# कल्याणमध्ये मजुराने स्वत:वर चाकूने वार करून जीवन संपविले

कल्याण : कल्याण पश्चिमेतील चिकणघर भागातील एका इमारत बांधकामावर काम करणाऱ्या मजुराने स्वत:वर धारदार चाकूने वार करून स्वत:चे जीवन संपविल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. रविवारी हा प्रकार घडला आहे. मानसिक तणावातून हा प्रकार घडल्याचा अंदाज पोलीस आणि मृताच्या नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. आमसी रंगू राय (४०) असे मयत मजुराचे नाव आहे. राय कुटुंब मुळचे झारखंड राज्यातील आहे. मजुरीसाठी ते कल्याणमध्ये आले आहे. महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी सांगितले, आमसी रंगू राय हे कल्याण पश्चिमेतील चिकणघर येथील छत्री बंगल्याजवळील पाण्याच्या टाकीजवळील आर. बी. कन्स्ट्रक्शन ओम पुष्पांजली इमारत येथे काम करत होते. त्यांच्या सोबत इतरही मजूर अनेक दिवसांपासून काम करत होते. परंतु, शनिवारी दुपारी आमसी रंगू राय यांनी काही कळण्याच्या आत आपल्या राहुटीत असलेल्या निवासस्थानातून चाकू आणला. इतर मजुरांना काही कळण्याच्या आत स्वताच्या गळ्यावर धारधार चाकूने वार करून स्वत:ला गंभीर जखमी केले. या इमारतीवर काम करणाऱ्या इतर मजुरांनी आमसी राय यांना तात्काळ कल्याण डोंबिवली पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात आणले. पण डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. आमसी राय अनेक दिवस मानसिक तणावाखाली होते. या कारणातून त्यांनी ही आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी घटनास्थळी मिळालेल्या माहितीवरून काढला आहे. आमसी राय यांच्या अल्पवयीन मुलाने याप्रकरणी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे.



सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना काम करूनही गेले दोन वर्ष झाले धकीत देणी दिलेली नाहीत या विरोधात आता सर्व कंत्राटदारांनी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाच्या माध्यमातून ठाण्यातील बाजारपेठेतील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाबाहेर निदर्शने करून आंदोलन केले. (छाया : मनोज सिंह)

# करंजाडेवासियांचे पाणी प्रश्नासाठी आंदोलन

पनवेल : लाखो रुपये किमतीची घरे खरेदी केली मात्र पिण्यासाठी मुबलक पाणी मिळत नसल्याने वर्षभरात करंजाडेवासियांना दीड कोटी रुपयांचे टँकरचे पाणी खरेदी करुन प्यावे लागले. अशी संतापजनक परिस्थिती करंजाडेची असल्याने करंजाडेवासियांना दुसऱ्यांदा मोर्चाचे हत्यार उपसावे लागले. मंगळवार आणि पाऊस असल्याने कामावर सुट्टी टाकून अनेक नागरिक या मोर्चात छत्री व पाण्याची बाटली घेऊन सहभागी झाले होते. यामध्ये मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरीक व महिलांचा समावेश होता.




करंजाडे वसाहतीच्या पाणी प्रश्नासाठी उरणच्या आमदारांचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप रहिवाशांकडून होत आहे. मागील अनेक वर्षे रहिवाशी समाजमाध्यमांवर आणि प्रसारमाध्यमांवर पाणी प्रश्नावर बोंबाबोंब करुनही उरणचे अपक्ष आ. महेश बालदी हे पाणी प्रश्न सोडवू न शकल्याने करंजाडेतील रहिवाशांनी संताप जाहीर केला होता. अखेर चार महिन्यांवर विधानसभेच्या निवडणूका असल्याने आ. बालदी यांनी सिडको भवनात करंजाडे वसाहतीच्या पाणी प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी मागील आठवड्यात सिडको अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

बार्टीमार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी

# जेईई आणि नीटच्या प्रशिक्षणासाठी अर्ज करण्याची ३० जून अंतिम तारीख

ठाणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई आणि नीट या प्रवेश परीक्षांचे नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. बार्टीमार्फत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई -१०० व नीट-१०० जागांकरिता प्रशिक्षण राबविण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३० जून २०२४ आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी केले आहे.

या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी इयत्ता ११ (विज्ञान) शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याजवळ महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास दाखला असावा. कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या घरात असावे. विद्यार्थी दिव्यांग असल्यास ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी.

जेईई आणि नीट (प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी नमुद केल्याप्रमाणे महिला ३० टक्के, दिव्यांग ५ टक्के, अनाथ १ टक्के, वंचित ५ टक्के जागा आरक्षित असतील. प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने इयत्ता १० वीच्या गुणांच्या आधारे गुणवत्ता निहाय उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी २४ महिन्यांचा असणार आहे. प्रशिक्षण काळात ७५ टक्के पेक्षा जास्त उपस्थिती राहिल्यास विद्यार्थ्यांना दरमहा रु.६०००/- एवढे विद्यावेतन दिले जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरीता प्रती विद्यार्थी रु.५०००/- एवढी एकरकमी रक्कम अदा करण्यात येणार आहे. या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करायचा आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३०/०६/२०२४ आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी https://jee-neet.barti.co.in/public/ या लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनिल वारे यांनी केले आहे.

# कर्नाळा किल्ल्यावर नवे भुयार सापडले

पनवेल : पनवेल तालुक्यातील कर्नाळा किल्ल्यावर रविवारी (ता. १६) प्राचीन भुयार आढळली आहे. गडकिल्ल्यांचे अभ्यासक व सह्याद्री प्रतिष्ठान सदस्य गणेश रघुवीर व सह्याद्री प्रतिष्ठान पनवेलचे सदस्य मयूर टकले यांच्या पाहणीत हे भुयार आढळले. याबाबतची माहिती गणेश रघुवीर यांनी वन विभाग व पुरातत्व विभागाला दिली आहे. यापूर्वी किल्यावर दोन भुयार आहेत. या भुयारांचा वापर पूर्वी वाटसरू थांबण्यासाठी किंवा ध्यानधारणेसाठी करत असल्याचा अंदाज दुर्ग अभ्यासकांनी व्यक्त केला आहे. कर्नाळा किल्याचे संरक्षण व जतनासाठी वन विभागाने इतिहास अभ्यासकांची एक समिती स्थापन केली आहे. गणेश रघुवीर हे त्याच समितीचे एक सदस्य आहेत. नोव्हेंबर २०२२ मध्ये गणेश यांच्या अभ्यासगटाने कर्नाळा किल्यावरील निसरड्या वाटा, किल्याचा कोणता भाग ढासळतोय त्यावर कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबतचा विस्तृत अहवाल बनवून दिला होता.

# कल्याण-डोंबिवलीत साथरोग नियंत्रणासाठी फवारणी मोहीम



कल्याण : पावसाळा सुरू झाल्याने विविध प्रकारचे साथरोग या काळात डोके वर काढतात. या साथरोगांचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कल्याण डोंबिवली पालिकेच्या घनकचरा विभागाने शहराच्या विविध भागात विशेष जंतुनाशक, धूर फवारणी मोहीम सोमवारपासून सुरू केली आहे.

आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्या आदेशावरून घनकचरा विभागाचे उपायुक्त अतुल पाटील यांनी या विशेष फवारणी मोहिमेचे नियोजन केले आहे. डोंबिवलीतील इंदिरा चौकातून या मोहिमेला सुरूवात करण्यात आली. यावेळी डोंबिवली विभागाचे मुख्य स्वच्छता अधिकारी वसंत देगलूरकर, स्वच्छता अधिकारी शरद पांढरे, के. पी. जगताप उपस्थित होते. या विशेष मोहिमेत १२२ सफाई कामगार, १२२ पितळी फवारणी पंप, ३० धुराच्या मशीन, तीन धुराच्या जीप्स, ११ ट्रॅक्टर्सचा समावेश आहे. सकाळ, संध्याकाळ ही फवारणी केली जाणार आहे. साथरोगाच्या नियंत्रणासाठी आयुक्तांनी विशेष फवारणी मोहीम सुरू केली असली तरी ज्या उघड्यावरील हातगाड्यांवरील खाद्य पदार्थांमुळे हे साथरोग पसरतात. त्या गाड्या ग प्रभाग सोडून नऊ प्रभागांच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. संध्याकाळी चार वाजल्यापासून खाऊ गल्ल्या ग्राहकांनी भरून जातात. सर्वाधिक हातगाड्या डोंबिवलीत ह प्रभाग, ई प्रभाग, ड, अ प्रभागात लावल्या जात असल्याच्या तक्रारी आहेत.

# केवळ एक रुपयात शेतकऱ्यांनी भात, नाचणी पिकांचा विमा उतरावा : अंकुश माने

ठाणे: नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषि विभागामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे तसेच पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण लाभणार आहे. कोकण विभागामधील शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात भात, नाचणी व उडिद या पिकांकरीता पीक विमा काढण्यासाठी अंतिम दिनांक १५ जुलै, २०२४ आहे, अशी माहिती कोकण विभागीय सहसंचालक अंकुश माने यांनी दिली आहे.

खरीप हंगाम २०२४ करीता पिक विम्यासाठी शेतकरी सहभागास सुरुवात झाली आहे. कोकण विभागामधील शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात भात, नाचणी व उडिद या पिकांकरीता पीक विमा उतरविता येईल. सदर योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी न होण्याचे घोषणापत्र योजनेत सहभागी होण्याच्या मुदतीच्या सात दिवस आधी बँकेत सादर करावे. घोषणापत्र दिलेल्या शेतकऱ्यांना योजनेच्या सहभागातून वगळण्यात येईल, असेही श्री. माने यांनी कळविले आहे.

ठराविक पिकांकरिता अधिसूचित असणाऱ्या महसूल मंडळामधील शेतकरी त्या पिकाचा विमा उतरवू शकतील. ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये नियुक्त युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड तर, पालघर व रायगड जिल्ह्यामध्ये चोलामंडलम एम. एस.जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे.



ठाणे, पालघर, रायगड व सिंधुदुर्ग जिल्हा भात पीक विमा संरक्षित रक्कम (रु. / हेक्टर) - ५१७६०/-, रत्नागिरी जिल्हा भात पीक विमा संरक्षित रक्कम (रु. / हेक्टर) - ५००००/-., ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा नाचणी पीक विमा संरक्षित रक्कम (रु./हेक्टर) - २००००/-., पालघर जिल्हा उडीद पीक विमा संरक्षित रक्कम (रु./हेक्टर) - २५०००/-.

ई-पीक पाहणीद्वारे नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांनी ई-पीक पहाणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे. विविध जोखामी अंतर्गत निश्चित होणारी नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील अटी व शर्तींचा अधिन राहून निश्चित केली जाईल. खरीप हंगाम २०२४ करिता सहभागाची अंतिम मुदत दिनांक १५ जुलै, २०२४ अशी आहे. पीक विम्यासाठी अर्ज सादर करताना बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ७/१२ उतारा, आधार कार्ड, पेरणी घोषणापत्र, बँकखात्याचे तपशील प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. पीक विमा पोर्टल, विमा कंपनी संकेतस्थळ, बँक, सहकारी पतसंस्था, पीक विमा अँप इत्यादी माध्यमांद्वारे शेतकरी योजनेत सहभागी होऊ शकतात. पीक विमा योजनेचे अर्ज भरताना बँकामधील गर्दी टाळावी याकरिता जनसुविधा केंद्रामार्फत (सी. एस.सी.) ऑनलाइन पद्धतीने पीक विमा अर्ज दाखल करता येईल.

शेतकऱ्यांना पीक विमा अर्ज भरताना कुठलीही अडचण येणार नाही, याची काळजी कृषि विभागाकडून घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी पीक विमा संरक्षणाचा लाभ मिळण्याकरीता योजनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक माने यांचे मार्फत करण्यात येत आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१